तरुण भारत

# विद्यापीठातर्फे गुरूवारपासून शाहू मिल येथे ग्रंथप्रदर्शन

कोल्हापूर : लोकराजा राजर्षी शाहू महाराज कृतज्ञता पर्वांतर्गत शिवाजी विद्यापीठातर्फे गुरूवारी २८ ते ३० एप्रिल या काळात शाहू मिल येथे ग्रंथप्रदर्शनाचे आयोजन केले आहे. ग्रंथप्रदर्शनाचे उद्‌घाटन गुरूवारी सकाळी १० वाजता होणार आहे. प्रदर्शनात ८० स्टॉल लावण्यात येणार आहेत. वाचन संस्कृती वाढावी, या उद्देशाने प्रदर्शन भरवले आहे. तरी प्रदर्शनाला भेट द्यावी, असे आवाहन विद्यापीठ प्रशासनाने केले आहे. अधिविभागप्रमुखांनी ज्ञान स्त्रोत केद्राने दिलेल्या बजेटमधून पुस्तकांची खरेदी करावी. विविध प्रकल्पांतर्गत मिळणाऱ्या अनुदानातून खरेदी करता येईल. शिक्षकांच्या वैयक्तिक ग्रंथालय योजनेतंर्गतदेखील पुस्तके खरेदी करावीत, असे आवाहन केले आहे.

26 APR 2022 पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# प्रोब स्टेशनविषयक संशोधनास भारतीय पेटंट

## शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. तुकाराम डोंगळे यांचा समावेश

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठातील स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी अधिविभागातील डॉ. तुकाराम डोंगळे यांच्यासह भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या मेकॅनिकल इंजिनिअरिंग शाखेचे विभागप्रमुख प्रा. सुनील कदम, पुणे येथील भारती विद्यापीठ इंजिनिअरिंग कॉलेजमधील प्रा. सचिन चव्हाण यांना 'प्रोब स्टेशन फॉर मेजरिंग सेमी-कंडक्टर डिव्हाईसेस' या उपकरणासाठी भारतीय पेटंट मिळाले आहे.


डॉ. तुकाराम डोंगळे


प्रा. सुनील कदम


प्रा. सचिन चव्हाण

उपकरणात सात प्रमुख घटक असून यात बेस, चक, प्लॅटन, कॅमेरा, तापमान नियंत्रक व मायक्रो मॅनिप्युलेटर यांचा समावेश आहे. या उपकरणाचा उपयोग सध्या शिवाजी विद्यापीठातील नॅनो सायन्सचे बी. एस्सी, एम. एस्सी. व संशोधक विद्यार्थी संशोधनासाठी करत आहेत. अनेक विद्यार्थ्यांनी संशोधक प्रकल्प पूर्ण केले आहेत. अशा प्रकारे हे उपकरण नॅनो सायन्स, इलेक्ट्रॉनिक्स, भौतिकशास्त्र, रसायनशास्त्रामधील संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांना संशोधन वृद्धीसाठी उपयुक्त ठरत आहे.


शिवाजी विद्यापीठातून...

अशा प्रकारच्या संशोधनातून अधिकाधिक उपयुक्त साधन सुविधांची निर्मिती होणे अपेक्षित आहे. पेटंटबाबत कृषी राज्यमंत्री डॉ. विश्वजित कदम, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. आर. के. कामत, भारती विद्यापीठाचे विभागीय संचालक डॉ. एच. एम. कदम यांनी संशोधकांचे अभिनंदन केले.

### स्वदेशी बनावटीच्या उपकरणामुळे आयात खर्च वाचणार

उपकरण कमी खर्चात तयार केले असून, त्याचा उपयोग सूक्ष्म इलेक्ट्रॉनिक उपकरणांचे विविध गुणधर्म तपासण्यासाठी होणार आहे. उपकरण सूक्ष्म डिव्हाईसेस ट्रान्झिस्टर, एलईडी, डायोड व मेमरी डिव्हाईस यांचे गुणधर्म तपासण्यासाठी उपयुक्त आहे. हे उपकरण सध्या अन्य देशांतून आयात करावे लागते; परंतु स्वदेशी बनावटीच्या उपकरणाच्या निर्मितीमुळे आयात खर्च वाचविता येणे शक्य होणार आहे.

26 APR 2022
लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


'भारती' व शिवाजी विद्यापीठातील प्राध्यापकांचे संशोधन : पेटंट प्राप्त

# कमी खर्चात तपासता येणार उपकरणांचे गुणधर्म

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील स्कूल ऑफ नॅनोसायन्स अँड टेक्नॉलॉजीमधील डॉ. तुकाराम डोंगळे आणि भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या मेकॅनिकल इंजिनिअरिंग शाखेचे विभागप्रमुख प्रा. सुनील कदम, पुणे येथील भारती विद्यापीठ इंजिनिअरिंग कॉलेजमधील प्रा. सचिन चव्हाण यांना प्रोब स्टेशन फॉर मेजरिंग सेमी-कंडक्टर डिव्हाइसेस या उपकरणासाठी पेटंट मिळाले. या उपकरणाद्वारे कमी खर्चात सूक्ष्म इलेक्ट्रॉनिक्स उपकरणांचे गुणधर्म तपासता येणार आहेत.


तुकाराम डोंगळे


सुनील कदम


सचिन चव्हाण

## संशोधनवृद्धीसाठी उपयुक्त

'प्रोब स्टेशन' हे उपकरण नॅनोसायन्स, इलेक्ट्रॉनिक्स, भौतिकशास्त्र, रसायनशास्त्रामधील संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांना संशोधनवृद्धीसाठी उपयुक्त ठरत आहे. अशा प्रकारच्या संशोधनातून अधिकाधिक उपयुक्त साधन सुविधांची निर्मिती होणे अपेक्षित आहे.

अत्यंत कमी खर्चात तयार केलेले हे उपकरण सूक्ष्म डिव्हाइसेस जसे की, ट्रान्झिस्टर, एलईडी, डायोड व मेमरी डिवाइस यांचे गुणधर्म तपासण्यासाठी उपयुक्त होऊ शकतो. सध्या उपकरण अन्य देशांतून आयात करावे लागते; परंतु स्वदेशी बनावटीच्या या उपकरणाच्या निर्मितीमुळे आयात खर्चही वाचविता येणे शक्य होणार आहे. या उपकरणांमध्ये सात प्रमुख घटक आहेत. यात बेस, चक, प्लॅन्टन, कॅमेरा, तापमाननियंत्रक व मायक्रो मॅनिप्युलेटर यांचा समावेश आहे.

उपकरणाचा उपयोग नॅनोसायन्सचे बी.एस्सी, एम. एस्सी. व संशोधक विद्यार्थी संशोधनासाठी करत आहेत. अनेक विद्यार्थ्यांनी संशोधक प्रकल्प पूर्ण केले आहेत. संशोधन करणाऱ्या प्राध्यापकांना कृषी राज्यमंत्री डॉ. विश्वजित कदम, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. आर. के. कामत, भारती विद्यापीठाचे विभागीय संचालक डॉ. एच. एम. कदम यांचे मार्गदर्शन लाभले.

26 APR 2022

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


# 'प्रोब स्टेशन'ला मिळाले भारतीय पेटंट

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठातील स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी अधिविभागातील डॉ. तुकाराम डोंगळे यांच्यासह येथील भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या मेकॅनिकल इंजिनिअरिंग शाखेचे विभागप्रमुख प्रा. सुनील कदम, तसेच पुणे येथील भारती विद्यापीठ इंजिनिअरिंग कॉलेजमधील प्रा. सचिन चव्हाण यांना 'प्रोब स्टेशन फॉर मेजरिंग सेमी-कंडक्टर डिव्हाइसेस' या उपकरणासाठी पेटंट प्राप्त झाले आहे.



डॉ. तुकाराम डोंगळे



प्रा. सुनील कदम



प्रा. सचिन चव्हाण

हे उपकरण अत्यंत कमी खर्चात तयार करण्यात आले. त्याचा उपयोग सूक्ष्म इलेक्ट्रॉनिक उपकरणांचे विविध गुणधर्म तपासण्यासाठी होणार आहे. हे उपकरण सूक्ष्म डिव्हाइसेस जसे की, ट्रान्झिस्टर, एलईडी, डायोड आणि मेमरी डिवाइस यांचे गुणधर्म तपासण्यासाठी उपयुक्त होऊ शकते. हे उपकरण सध्या अन्य देशांतून आयात करावे लागते; परंतु स्वदेशी बनावटीच्या या उपकरणाच्या निर्मितीमुळे यावरील आयात खर्चही वाचवता येणार आहे. या उपकरणांमध्ये बेस, चक, प्लॅन्टन, कॅमेरा, तापमान नियंत्रक व मायक्रो मॅनिप्युलेटर असे एकूण सात प्रमुख घटक आहेत. याचा उपयोग सध्या शिवाजी विद्यापीठातील नॅनोसायन्सचे बी.एस्सी, एम.एस्सी. आणि संशोधक विद्यार्थी संशोधनासाठी करत आहेत.

पेटंटबाबत राज्याचे कृषी राज्यमंत्री डॉ. विश्वजित कदम, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. आर. के. कामत, तसेच भारती विद्यापीठाचे विभागीय संचालक डॉ. एच. एम. कदम यांनी सर्व संशोधकांचे अभिनंदन केले.

2 6 APR 2022 तरूण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# प्रोब स्टेशनविषयक संशोधनाला पेटंट

## डॉ. तुकाराम डोंगळे, प्रा. सुनील कदम, प्रा. सचिन चव्हाण यांचे संशोधन

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी विभागातील डॉ. तुकाराम डोंगळे, भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ इंजिनियरिंगच्या मेकॅनिकल इंजीनिअरिंग शाखेचे विभागप्रमुख प्रा. सुनील कदम, पुणे येथील भारती विद्यापीठ इंजिनिअरिंग कॉलेजमधील प्रा. सचिन चव्हाण यांना 'प्रोब स्टेशन फॉर मेजरींग सेमी-कंडक्टर डिव्हाइसेस" यासाठी पेटंट मिळाले आहे.

तीन संशोधकांच्या पथकाने बनवलेले उपकरण अत्यंत कमी खर्चात तयार केले आहे. त्याचा उपयोग सूक्ष्म इलेक्ट्रॉनिक उपकरणांचे विविध गुणधर्म तपासण्यासाठी होणार आहे. ते सूक्ष्म डिव्हाइसेस ट्रान्झिस्टर, एलईडी, डायोड आणि मेमरी डिव्हाईसचे गुणधर्म तपासण्यासाठी उपयुक्त होऊ शकते. ते सध्या आयात करावे लागते. स्वदेशी बनावटीच्या उपकरण निर्मितीमुळे आयात खर्चही कमी होण्याची शक्यता आहे. पेटंटबाबत कृषी राज्यमंत्री, भारती विद्यापीठाचे सेक्रेटरी डॉ. विश्वजीत कदम, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, विज्ञान व तंत्रज्ञान शाखेचे अधिष्ठाता डॉ. आर. के. कामत, भारती विद्यापीठाचे विभागीय संचालक डॉ. एच. एम. कदम यांनी अभिनंदन केले आहे.


डॉ. तुकाराम डोंगळे


प्रा. सुनील कदम


प्रा. सचिन चव्हाण

### संशोधनासाठी उपयुक्त उपकरण

उपकरणांमध्ये सात प्रमुख घटक आहेत. यामध्ये बेस, चक, प्लॅन्टन, कॅमेरा, तापमान नियंत्रक व मायक्रो मॅनिप्युलेटरचा समावेश आहे. याचा उपयोग शिवाजी विद्यापीठातील नॅनोसायन्सचे बी.एस्सी, एम.एस्सी. व संशोधक विद्यार्थी संशोधनासाठी करतात. अनेक विद्यार्थ्यांनी संशोधन प्रकल्प पूर्ण केले आहेत. हे उपकरण नॅनोसायन्स, इलेक्ट्रॉनिक्स, भौतिकशास्त्र, रसायनशास्त्रामधील संशोधक विद्यार्थ्यांना उपयुक्त ठरत आहे. यातून अधिकाधिक उपयुक्त साधनसुविधांची निर्मिती होणेही अपेक्षित आहे.

लोकमत

# पुनर्परीक्षेस ४५०० विद्यार्थ्यांची हजेरी

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : तांत्रिक कारणामुळे पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या नऊ हजार विद्यार्थ्यांना हिवाळी सत्रातील परीक्षा देता आली नव्हती. त्यांच्यासाठी शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाकडून सोमवारपासून पुनर्परीक्षा सुरू करण्यात आली. पहिल्या दिवशी कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील ४५०३ विद्यार्थ्यांनी ऑनलाईन परीक्षा दिली. त्यासाठी ५९३९ जणांनी नोंदणी केली होती.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर विद्यापीठाने हिवाळी सत्रातील विविध अभ्यासक्रमांच्या ३६२ परीक्षा ऑनलाईन घेतल्या. त्यात तांत्रिक आणि इतर कारणांमुळे काही विद्यार्थ्यांना एक-दोन विषयांचे पेपर देता आले नव्हते. त्यांच्यासाठी विद्यापीठाने पुनर्परीक्षा घेण्याचे ठरविले. या परीक्षेसाठी ऑनलाइन नावनोंदणी करण्याचे अशा विद्यार्थ्यांना आवाहन केले. त्यावर नऊ हजार विद्यार्थ्यांनी नोंदणी केली. त्यांची पुनर्परीक्षा सोमवारपासून सुरू झाली. दि. ५ मेपर्यंत होणाऱ्या परीक्षेत विविध अभ्यासक्रम, विषयांचे ९०० पेपर घेण्यात येणार आहेत. दरम्यान, परीक्षा व मूल्यमापन मंडळाने सोमवारी एमबीए सत्र दोन, तीन आणि चार या परीक्षांचे निकाल जाहीर केले.

पुढारी

# राजर्षी शाहू महाराज स्मृती-शताब्दी कृतज्ञता पर्वानिमित्त २८ पासून ग्रंथप्रदर्शन

**कोल्हापूर :** राजर्षी शाहू महाराज यांच्या स्मृती शताब्दी वर्षानिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या वतीने दि. २८ ते ३० एप्रिल या कालावधीत शाहू छत्रपती मिल आवार येथे भव्य ग्रंथप्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे.

दरवर्षी विद्यापीठामार्फत पदवी प्रदान समारंभाचे औचित्य साधून ग्रंथमहोत्सवाचे आयोजन केले जाते. परंतु गेल्या दोन वर्षांत कोरोना सदृश्य परिस्थितीमुळे महोत्सव होऊ शकला नाही. जिल्हाधिकारी यांच्यामार्फत लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या स्मृती-शताब्दी वर्षानिमित्त २२ मे पर्यंत राजर्षी शाहू कृतज्ञता पर्व होणार आहे. त्याचाच एक भाग म्हणून ग्रंथप्रदर्शन भरविले आहे. ग्रंथप्रदर्शनात ८० प्रकारचे स्टॉल लावण्यात येणार आहेत. ग्रंथप्रदर्शनाचे उद्घाटन दि. २८ रोजी सकाळी १० वाजता होणार आहे, अशी माहिती बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्त्रोत केंद्राच्या संचालिका डॉ. नमिता खोत यांनी दिली.

पुण्यनगरी

# संशोधन ही उपयुक्त, पण गंभीर प्रक्रिया : डॉ. महाजन

कोल्हापूर : निराधार विधानाला संशोधनात स्थान नाही. त्यामुळे संशोधन ही एक उपयुक्त; पण गंभीर प्रक्रिया आहे, असे प्रतिपादन वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता प्रा. डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागातर्फे आयोजित 'संशोधन प्रस्ताव तयारी' या कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. यावेळी डॉ. ए. एम. गुरव यांनीही मनोगत व्यक्त केले. डॉ. केदार मारुलकर यांनी प्रास्ताविक केले. प्रा. अर्चना मानकर यांनी आभार मानले. कार्यशाळेसाठी केतकी कांबळे, दीप्ती भोसले, नेताजी दबडे यांनी परिश्रम घेतले.

पुण्यनगरी

# शाहू मिलमध्ये २८ पासून ग्रंथ प्रदर्शन



**कोल्हापूर :** राजर्षी शाहू कृतज्ञता पर्वाचा एक भाग म्हणून दि. २८ ते ३० एप्रिल या कालावधीत शाहू छत्रपती मिल आवारामध्ये ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन करण्यात येणार आहे. ही माहिती डॉ. नमिता खोत यांनी दिली आहे. शिवाजी विद्यापीठातर्फे पदवीदान समारंभाचे औचित्य साधून ग्रंथ महोत्सवाचे आयोजन केले जाते; परंतु गेल्या दोन वर्षांत कोरोनामुळे महोत्सव होऊ शकला नाही. ही उणीव लोकराजा राजर्षी शाहू महाराज ग्रंथ प्रदर्शनामुळे भरून निघणार आहे. या ग्रंथ प्रदर्शनात नामवंत प्रकाशक, पुस्तक विक्रेते व वितरक यांचे ८० प्रकारचे स्टॉल लावण्यात येणार आहेत.